## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :६२०/२०२२/जळगाव**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. भरत कुंदन कोळी,<br>रा. मु. पो. भालोद, ता. यावल,<br>जि. जळगांव. | सचिव,<br>श्री. सरस्वती विद्याप्रसारक मंडळ,<br>भुसावळ, तृप्ती बिल्डींग, तापीनगर,<br>ता. भुसावळ, जि. जळगाव. |

**सुनावणी दिनांक २५/०६/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक ०६/१२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २५/०६/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित आणि संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक. ०६/१२/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेशाप्रमाणे कोणतीही माहिती व दस्तऐवज आजपावेतो दिलेले नाही. व आयोगाच्या आदेशानंतर ही माहितीची मागणी केली असता हेतुपुरस्कर माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आदेशाची अवमान केलेला आहे व आदेशाची अंमलबजावणी हेतुपुरस्कर करीत नाही. त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई व्हावी.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. १४८३/२०१९/जळगाव वरील निर्णय दिनांक ११/०३/२०२२ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री. संजय सुराणा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३/०१/२०१९ रोजीच्या माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने अथवा समक्ष विनामुल्य पुरवावी.

४) सुनावणीपुर्वी प्रस्तुतच्या तक्रार अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नाही. तसेच सुनावणीसाठी देखील संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. तथापि, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्रतिनिधी मार्फत सादर केलेल्या दिनांक २५/०६/२०२४ च्या खुलाशात सदर संस्थेला माहिती अधिकार कायदा लागू होत नाही. असे नमूद केलेले आहे. मात्र यासंदर्भात दि. ११/०३/२०२२ रोजीच्या निर्णयात सविस्तर विवेचन केलेले आहे. त्यामुळे आता या युक्तिवादात तथ्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. १४८३/२०१९/जळगाव मध्ये दिनांक ११/०३/२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. १४८३/२०१९/जळगाव मध्ये दिनांक ११/०३/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री. संजय सुराणा यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे

विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी तात्काळ आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक ६२०/२०२२/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रत — माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी

सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगांव, ग्राहक न्यायालयाच्या मागे, आकाशवाणी केंद्राजवळ, जळगाव.

यांना कळविण्यात येते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.

जावक क्र ९८३८ 10 MAR 2025